# दि.बा.मोकाशी यांच्या साहित्याचा अभ्यास : एक आकलन

**प्रा.रोशन शंकर भोवते**
मराठी विभाग
स्व.निर्धन पाटील वाघाये
कला व विज्ञान महाविद्यालय,
मुरमाडी,ता-लाखनी,जि.भंडारा

**सारांश:**

एका लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास विविध पद्धतीने आणि दृष्टिकोनातून केला जातो. लेखकाच्या समग्र साहित्याचे आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन होण्यासाठी तसेच त्या भाषेतील साहीत्यात त्या लेखकाचे स्थान निश्चित करण्यासाठी हे आवश्यकही असते. साहित्यावर लेखकाच्या व्यक्तित्त्वाचा, जीवनदृष्टीचा ठसा उमटत असतो. एकाच कालखंडात किंवा एकाच विषयावर निर्माण होण्याऱ्या दोन साहित्यकृतीत भिन्नता दिसून येते. त्या दोन साहित्यकृती पूर्णतः वा अंशतः भिन्न असतात. याचे कारण म्हणजे त्या साहित्यकृतीतून त्या निर्मात्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला असतो. दि.बा.मोकाशी यांनी कादंबरी, प्रवासवर्णने, बालसाहित्य, विज्ञानसाहित्य इत्यादी वाङ्मय प्रकारातून लेखन केले. आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या मध्यमवर्गीय सामाजिक जीवनाचे वास्तव चित्रण त्यांच्या कादंबरीतून आले आहे. मानवी जीवनाचा शोध, सर्वसामान्य माणसांचे प्रश्न, समस्या यांचे चित्रण करणे हा त्यांच्या कादंबरी लेखनाचा मुख्य हेतू आहे. शोध ही त्यांच्या कादंबरीलेखनाची प्रेरणा दिसून येते. हे केंद्रिभूत तत्त्व समोर ठेऊन प्रस्तुत शोधपत्रात दि.बा.मोकाशी यांच्या साहित्याचा अभ्यास केला आहे.

**सूचकशब्द:** दि.बा.मोकाशी, व्यक्तिमत्त्व ,साहित्यकृती, व्यक्तिचित्रण,

## प्रस्तावना:

लेखकाच्या साहित्यकृतीतून सामाजिक वास्तवाचे चित्रण केलेले असते. अर्थात हे वास्तवाचे चित्रण निव्वळ फोटोग्राफीसारखे नसते तर त्या सामाजिक चित्रणावर लेखकाच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीचा, जीवनदृष्टीचा आणि संवेदनस्वभावाचा परिणाम होत असतो. म्हणून ललित साहित्यकृतीतून त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व, जीवनदृष्टी, अनुभवविश्व आणि संवेदनस्वभाव जितका ठसठशीतपणे अभिव्यक्त होतो तितके त्याचे साहित्य अनन्यसाधारण आणि श्रेष्ठ ठरत असते. तसेच सभोवतालचे वातावरण आणि परंपरेचा लेखकावर परिणाम होतो.दि.बा.मोकाशी यांनी कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, बालसाहित्य आणि विज्ञान साहित्य या वाङ्मय प्रकारात विपुल लेखन केले. या सर्वच वाङ्मय प्रकारातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला दिसून येतो. दि.बा.मोकाशी यांच्यासाहित्यकृतीतून दुसऱ्या  महायुद्धानंतरच्या आणि औद्योगिक क्रांतीनंतरच्या मध्यमवर्गीय सामाजिक जीवनाचे चित्रण स्पष्टपणे येते. दुसर्या  महायुद्धामुळे झालेली प्रचंड जीवित व वित्त हानी, आजपर्यंत मध्यमवर्गीय समाजाने जपलेली श्रद्धा, मुल्ये, समजुती यांना बसत असलेले तडे, औद्योगिक क्रांतीतून एकत्र कुटुंबपद्धतीचे झालेले विघटन आणि नातेसंबंधात आलेला दुरावा याचे वास्तव चित्रण त्यांच्या साहित्यातून येते. दि.बा.मोकाशी यांना जीवन जगताना, परिस्थितीशी टकरा देण्याऱ्या सामान्य माणसांच्या जीवनवविषयी विलक्षण कुतूहल आहे. दैनंदिन जीवनात नित्य घडणाऱ्या घटना-प्रसंगातून जीवनानुभवाची मांडणी करताना त्यांची कथा कलात्मक उंची गाठते. ते आपल्या अनुभवविश्वाशी प्रामाणिक राहून मध्यमवर्गीय सामाजिक जीवनाचे चित्रण करतात. यामुळे कौटुंबिक नातेसंबंध, व्यक्ती आणि सामाजिक संबंध, त्यांची सुख-दुःखे, श्रद्धा, मूल्ये, समजूती भावभावनांना जे वेगवेगळे आकार प्राप्त होतात. त्यांची रूपे शोधण्यात दि.बा.मोकाशी यांना रस असलेला दिसून येतो. एखाद्या साहित्यकृतीतून सभोवतालच्या सामाजिक वास्तवाचे नुसते चित्रण करणे ही कलात्मकतेची कसोटी ठरत नाही. वास्तवातून घडलेल्या व्यक्ती, तिच्या भावभावना, विकार, वासना यांचे वास्तवाशी अपरिहार्य नाते असणे जितके आवश्यक ठरते तितकाच लेखकाचा जीवनानुभव प्रत्ययकारीपणे व्यक्त होणे आवश्यक ठरते. या दोन्ही अटीचे पालन एखादी साहित्यकृती करत असली तरच ती कलात्मकतेच्या कसोटीस उतरली असे म्हणता येईल. दि.बा.मोकाशी यांचे साहित्य या कसोटयाला पूर्णतः उतरले आहे. दुसरे जागतिक महायुद्ध आणि औद्योगिक क्रांतीनंतर समाजवास्तवाची जी नव्याने जडणघडण होत होती, एक नवी संवेदनशीलता निर्माण होत होती. या सामाजिक वास्तवातून आणि नवसंवेदनशीलतेतून नवकथेचा उदय झाला.

दि.बा.मोकाशी हे नवकथेच्या प्रवाहातील एक महत्त्वपूर्ण लेखक असल्याने नवकथेच्या जडणघडणीत दि.बा.मोकाशींच्या कथेचे योगदान आहे. तसेच दि.बा.मोकाशींच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा, त्यांची अनुभव घेण्याची पध्दती आणि त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा त्यांच्या साहित्याच्या रचनातत्वावर परिणाम घडून आले. दि.बा.मोकाशींनी आपल्या कथेतून महायुद्धोत्तर मध्यमवर्गीय जीवनाचे वास्तव चित्रण केले. हे चित्रण करताना आपल्या कथेला कोणतेही सामाजिक परिणाम देण्याचा ते मुद्दामहून प्रयत्न करीत नाहीत. आपल्या अनुभवविश्वाशी प्रमाणिक राहून कलावंताच्या अलिप्ततेने ते कौटुंबिक जीवनाचे चित्रण करतात, असे दिसून येते . दि.बा.मोकाशी यांनी नवकथेच्या प्रवाहात लेखन केले. नवकथेचा मुख्य सूर हा निराशा, अश्रद्ध, विफलता, एकाकीपणा यांचे चित्रण करणे हा होता. हे चित्रण संज्ञाप्रवाही चित्रणपद्धतीतून नवकथाकारांनी केले. दि.बा.मोकाशींच्या कथेतून निराशा, अश्रद्धा, एकाकीपणा, विफलता यांचे चित्रण आढळत नाही. त्यांच्या कथेतून जीवनाविषयीची श्रद्धा, आशावाद यांचे चित्रण येते. याचे कारण म्हणजे त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोन होय. जीवन हे आनंदमय आहे. ही त्यांची जीवनविषयीची धारणा आहे. या आशावादी दृष्टिकोनाचा प्रभाव त्यांच्या कथेतून उमटला असल्याने त्यांची कथा कुठेही जीवनाचे कडवट सूर आळवत नाही. त्यांच्या समकालीन कथाकारांप्रमाणे जीवनातील अश्रद्धा, विफलता, निराशा, परात्मता या जाणिवेचे चित्रण त्यांच्या कथेतून आढळत नाही.

**साहित्याची प्रेरणा:**

लेखकाच्या साहित्यकृतीचे स्वरूप त्यांच्या लेखनामागील प्रेरणावर अवलंबून असते. म्हणून दि.बा.मोकाशी यांच्या कथेचे स्वरूप आणि आकलन होण्यासाठी त्यांच्या कथालेखनामागील प्रेरणांचा शोध घ्यावा लागतो. तो शोध घेतला असता असे आढळून आले की, दि.बा.मोकाशी यांना सर्वसामान्य माणसांच्या धडपडीत विलक्षण कुतुहल आहे, जिज्ञासा आहे असे दिसते. सर्वसामान्य माणसांना जगण्यासाठी परिस्थितीशी टकरा खाव्या लागतात. तिच्याशी झगडावे लागते. धडपड करावी लागते. या धडपडीच्या मागे काय आहे? मी कोण? मी इथे का ? या तत्त्वज्ञांनी प्रश्नांची सोडवणूक करणे आणि त्यांना आलेल्या जीवनानुभवांची प्रचिती वाचकांना घडविणे, या त्यांच्या कथेच्या प्रेरणा दिसून येते. या प्रेरणेतून त्यांच्या कथेची जडणघडण झालेली दिसून येते. त्यांच्या कथेतून व्यक्ती, घटना आणि प्रसंग यांच्या वर्णनातून एखादा जीवनानुभव ते कथेतून साकारत

जातात. दि.बा.मोकाशीच्या कथेतून मानवी मनाचे ठायी ठायी चित्रण येते. मात्र त्यांची कथा मनोविश्लेषणाचे चित्रण करत नाही. बाह्य घटना प्रसंगाचे वर्णन न करता माणसांच्या मनाचे चित्रण करण्यावर तो आपले लक्ष केंद्रित करते.

**व्यक्तिचित्रण:**

दि.बा.मोकाशींच्या कथेतील व्यक्तिचित्रण वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रणावर त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा प्रभाव पडलेला आहे. त्यांच्या कथेतील पात्रांचे बाह्य शरीरवर्णन कथेतून केलेले दिसत नाही. दि.बा.मोकाशींच्या कथेतील पात्रे ही जीवनाच्या एका टोकाला जाऊन कुठेही वागत नाहीत किंवा भावनांच्या आहारी जाऊन कृती करीत नाहीत. त्यांची भूमिका समजून व सामावून घेण्याची दिसते. दि.बा.मोकाशींच्या कथेतील पात्रे जीवनाविषयी फार अपेक्षा बाळगणारी नाहीत. ती अल्पसंतुष्ट वृत्तीची आहेत याचे कारण म्हणजे दि.बा.चे व्यक्तिमत्त्व होय. फारशा गरजा न वाढविता सुखासमाधानाने जीवन कसे जगावे याचे बाळकडूच त्यांना आईवडिलांपासून मिळाले आहे. याचा परिणाम त्यांच्या कथेतील पात्रांवर पडलेला दिसतो. त्यांच्या कथेची एक विशिष्ट रचनापद्धती दिसून येते. त्यांच्या कथेचा परिघ मर्यादित आहे. त्यांची कथा मध्यमवर्गीय परिघातच वावरताना दिसते. ते आपल्या कथेला मुद्दामहून सामाजिकतेचे परिणाम देत नाहीत, असे असले तरी त्यांचे अनुभवविश्व व्यापक आहे. मध्यमवर्गीय जीवनातील सर्व अनुभवाला त्यांची कथा स्पर्श करते. शिवाय त्यांच्या कथेतून सर्व स्तरातील माणसांचे चित्रण आलेले आहे. म्हणून त्यांची कथा आशयदृष्टया संपन्न झालेली दिसून येते. विषयालाच ते सरळ हात घालतात. आजपर्यंत कथेचा विषय होऊ न शकलेले साध्य विषय, घटना यातून ते कथानकाची रचना करतात. वर्णनांचा फापटपसारा त्यांच्या कथेतून येत नाही. निसर्गवर्णने ही त्यांच्या कथेतून फारशी आढळत नाहीत. म्हणून त्यांची कथा आटोपशीर बनली आहे. त्यांच्या कथेतील संवादरचनेतून नाटय ओतप्रोत भरलेले दिसते. त्यांच्या कथेचा अभ्यास केला असता प्रसन्नता, चिंतनशीलता आणि ताजेपणा ही त्यांच्या कथेची व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये जाणवतात.

**भाषाशैली:**

दि.बा.मोकाशी यांच्या कथेची भाषा ही खास त्यांची आहे. अलंकाराने ती नटत नाही की, खोटया काव्यात्मकतेच्या आहारी जात नाही. दैनंदिन जीवनात वापरली जाणारी बोलीभाषा विविध प्रकारच्या लयीत वाकवून ते वापरतात. कोकणी बोलीतील शब्द, तरूण मुलींच्या लकबी, म्हाताऱ्या माणसांचे निर्वाणीचे उद्गार याचा कुशलतेने उपयोग करतात. त्यांच्या कथेतील अनुभव साक्षात करण्यासाठी त्यांची भाषा समर्थ असल्याचे दिसून येते. बालकावर निसर्गप्रेम, जीवनमूल्ये, ज्ञान आणि संस्कार त्यांच्या बालसाहित्यातून केल्याचे विशेषसत्वाने जाणवते. बालकांचे चित्त आकर्षित होईल असे अद्‌भुतरम्य वातावरणनिर्मिती, फॅन्टसीचे चित्रण आलेले आहे. बालमनाला अनुरूप अशी भाषाशैली बालसाहित्यातून आलेली आहे. दि.बा.मोकाशींच्या कथेतील भाषा साधी, सरळ असून बोलीभाषेतील विविध लयींचा आणि लकबीचा वापर करून कथेतील जीवनानुभव ते व्यक्त करतात. त्यांची भाषा अलंकाराने नटत नाही की, बोजड तत्त्वज्ञानाने कुंठीत होत नाही. कथेचे विषय, आशयसूत्रे आणि भाषाशैली याकडे सहज पाहिले तरी त्यांच्या कथेचे वेगळेपण नजरेत भरते.

**दि.बा.मोकाशी यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये:**

दि.बा.मोकाशी यांच्या कथेतून घटना-प्रसंग आणि भावना यांचे अतिरेकी भडक चित्रण येत नाही. त्यांच्या कथेतील पात्रे अतिशय टोकाला जाऊन कृती करताना दिसत नाहीत. त्यांच्या कथेतील ही पात्रे जीवन समजलेली व न समजलेली अशी आहेत. पात्रांच्या लकबीतून, हालचालीतून त्यांच्या अंतर्मनाचे ते दर्शन घडवितात. दि.बा.मोकाशी आपल्या कादंबरीतून कौटुंबिक जीवनाचे चित्रण करतात. त्यामुळे त्यांच्या कादंबरीला 'देव चालले' या कादंबरीचा अपवाद सोडला तर व्यापक सामाजिक जीवनाचे चित्रण येत नाही. ही त्यांच्या एकूणच साहित्याची मर्यादा म्हणता येईल. शिवाय कोणताही अनुभव मग तो कितीही गुंतागुंतीची असो तो वाचकाला सहज समजला पाहिजे या त्यांच्या भूमिकेमुळे साधी, सरळ रचना झाली असली तरी मानवी जीवनातील व्यामिश्रता, गुंतागुंत दाखवण्यात त्यांच्या कथेला अपयश आलेले दिसून येते.त्यांच्या  बालसाहित्यातून बालमनोविश्वाचा विचार केलेला दिसून येतो. बालकांच्या अवतीभोवतीचे घटना-प्रसंग आणि वातावरणातून

दि.बा.मोकाशी कथेची निर्मिती करतात. त्यांच्या कथेतील उपदेश सूचक आहे. मुलांच्या दैनंदिन जीवनात नित्य वापरण्यात येण्यार्या यांत्रिक वस्तूंची ओळख त्यांनी करून दिली आहे. इतिहास, भूगोल हे शालेय जीवनातील विषय सोपे आणि रंजक पद्धतीने मांडले आहे. दि.बा.मोकाशींच्या विज्ञान कथेचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, दि.बा.मोकाशींची विज्ञानकथा ही अद्‌भुतरम्य परीकथेसारखी आहे. आजच्या विज्ञान कथेचे जे स्वरूप् आहे तशा प्रकारची कथा दिसून येत नाही. किंबहुना तिला विज्ञान कथा म्हणणे धाडसाचे होईल. असे असले तरी विज्ञान कथालेखनाकडे त्यांच्या कथेने अभ्यासकांचे लक्ष वेधण्याचे काम केलेले आहे, असे म्हणता येईल. दि.बा.मोकाशी यांच्या साहित्यातील भाषा साधी, सरळ आणि सहज आहे. अलंकाराने ती नटत नाही की, विचाराने कुंठीत होत नाही. तरूण मुलांची सांकेतिक भाषा, कोकणी बोलीभाषा यांच्या नाद, लयींचा ते उपयोग करून अनुभवसाक्षात करतात, असे दिसून येते. मराठी साहित्यात नवकथाकार म्हणून गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगूळकर ही चारच नावे अग्रक्रमाने घेतली जातात, परंतु व्यक्तित्त्वसापेक्ष जीवनानुभव, त्यांच्या साहित्यातून केलेला प्रामाणिक अविष्कार आणि त्यातून कथेला प्राप्त होणारी नवी रूपसिद्धी अशी नवकथेविषयी व्यापक भूमिका स्वीकारली तर दि.बा.मोकाशी हे पाचवे नवकथाकार म्हणून नवकथाकारांच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट करण्यास काही हरकत नसावी.दि.बा.मोकाशी यांचा प्रमुख आस्थविषय मानवी जीवनाचा शोध हा आहे. दैनंदिन जीवन जगण्यासाठी परिस्थितीशी टकरा देणारा, संघर्ष करणारी माणसे हा त्यांच्या कथेचा विषय आहे. साहीत्यामुळे मानवी भावभावनांचे उन्नयन होते. साहित्य हे आत्मसंस्करण असून उत्कटपणे जगण्याचा व आनंद द्विगुणीत करण्याचा मार्ग आहे. साहित्यातून लेखकाच्या जाणिवेचा अविष्कार होतो. या जाणिवा तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक वातावरण, मूल्ये यातून घडतात. दि.बा.मोकाशी यांची कथा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे साधी, सरळ आणि सहज आहे. दि.बा.मोकाशी यांच्या कथेतील पात्रचित्रण, निवेदन, भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या कथेतील पात्रांचे चित्रण करताना ते शारीरिक वर्णन करीत नाहीत. एखाद्या घटना-प्रसंगाच्या निमित्ताने त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगळयाच पैलूचे दर्शन घडवितात. पात्रांच्या बाह्यकृतीच्या मागे त्यांचे अंतर्मन असते. ते पात्रांचे अंतर्मन चित्रित करतात, परंतु त्यात कुठेही मनोविश्लेषण येत नाही. दि.बा.मोकाशींच्या कथेतील पात्रे अतिशय टोकाला जाऊन कृती करत नाहीत तर ती विलक्षण समजूतदार आहेत. जीवनानुभवाचे चित्रण करताना निवेदनाच्या विविध पद्धतीचा वापर कथेतून

करतात. कथेतून तृतीयपुरूषी निवेदन आणि पात्रांच्या भूमिकेतूनही एकाचवेळी निवेदन करतात. असे केल्यामुळे कुठल्याही प्रसंगाच्या व घटनेच्या अनेक पैलूंवर या निवेदनातून प्रकाश पडतो.

**समारोप:**

कोणत्याही कालखंडातील साहित्य प्रवाहातून विशिष्ट प्रवृत्ती, सूर, ठाशीवपणे प्रकटलेला असतो. दि.बा.मोकाशींच्या लेखन कालखंडात (1941-1981)नवकथेच्या प्रवाहात जेवढया कथा लिहिल्या गेल्या त्या सर्व कथासृष्टीच्या पाश्र्वभूमीवर मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारी कथा दि.बा.मोकाशी यांनी लिहिली. त्यांचे अनुभवविश्व व्यापक आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचे चित्रण करताना त्यांच्या कथेतून विविध स्तरातील माणसांचे चित्रणही आलेले आहे. दि.बा.मोकाशी यांच्या काळातील नवसाहित्याचा सूर निराशा, जीवनाची अर्थशून्यता, वैफल्यग्रस्तता अगतिकता, यंत्रवतता याने भरलेला होता; परंतु दि.बा.मोकाशी यांच्या साहित्यातून हा सूर उमटलेला नाही. याचे कारण म्हणजे जीवन हे आनंददायी आहे. ठराविक परिघातही तृप्ततेने जगता येते. ही त्यांची जीवनाविषयीची भूमिका आहे. जीवनविषयीच्या त्यांच्या या स्वागतशील भूमिकेचा, वाङ्‌‍मयीन व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या जीवन दृष्टिकोनाच्या प्रभावातून त्यांच्या कथेची जडणघडण झालेली आहे. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा आणि साहित्यविषयक दृष्टिकोनाचा ठसा त्यांच्या साहित्यावर उमटला गेल्याने त्यांचे साहित्य निराशावादाने झाकोळून गेलेले नाही. ते विलक्षण आशावादी बनले आहे. दि.बा.मोकाशी यांच्या कथेवरच नव्हे, तर एकूणच त्यांच्या साहित्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला आहे. त्यांचे साहित्य साधे, सरळ आणि सहज आहे. ते जीवनाच्या गाभ्यालाच भिडणारे आहे. दररोजच्या जिवनाशी निगडीत आहे. म्हणून त्यांचे नवकथालेखनच नव्हे, तर एकूणच साहित्य टवटवीत आणि प्रसन्न आहे.

**संदर्भ सूची:**


- डॉ.अ.ना.देशपांडे:आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास खंड-1, व्हीनस प्रकाशन, पुणे

- इंदुमती शेवडे :मराठी कथा उगम आणि विकास, सोमैया पब्लि. प्रा.लि.मुंबई-दिल्ली
- मधु कुलकर्णी:ललित साहित्यातील जडणघडण, शुभदा सारस्वत पब्लि. प्रा.लि.पुणे,
- प्रा.ना.सी.फडके :लघुकथा लेखन: तंत्र आणि मंत्र व्हिनस प्रकाषन, पुणे पहिली आवृत्ती,